# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचनाक्रमांक 2007/(322/07)विशि-4 महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम 1994(1994 चा महा.35) च्या कलम ३ च्या पोटकलम(2) अन्वये दिनांक 27 सप्टेंबर, 2011 रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, 2016 (सन 2017 चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक 6) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(आस्थापना विभाग)**

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली 442605

दुरध्वनी क्र. 07132-223104 email: -establishment.section@unigug.ac.in

जा.क्र. गो.वि./आस्था./१४२८/२०२५ दि.२४/०४/२०२५

## *अधिसुचना*

**विषय:- उष्णतेच्या लाटेचा ऑरेंज अलर्ट व येलो अलर्ट बाबत सुचना.**
**संदर्भ:**- मा. जिल्हाधिकार, चंद्रपुर यांचे आदेश दिनांक २३/०४/२०२५

विद्यापीठाशी संलग्नित चंद्रपुर जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयातील मा. प्राचार्य महोदयांना कळविण्यात येते की, मा. जिल्हाधिकारी, चंद्रपुर तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, चंद्रपुर यांचे संदर्भांकित पत्रान्वये चंदपुर जिल्ह्याकरीता प्रादेशिक हवामान केंद्र, भारतीय हवामान खाते, नागपुर यांनी दिनांक २२ ते २४ एप्रिल, २०२५ पर्यंत उष्णतेच्या लाटेचा ऑरेंज अलर्ट व दिनांक २५ ते २७ एप्रिल, २०२५ पर्यंत उष्णतेच्या लाटेचा यलो अलर्ट देण्यात आलेला असल्याचे कळविले आहे. त्याअनुषंगाने महाविद्यालयातील शिकवणी वर्गाची वेळ दिनांक २३/०४/२०२५ पासून दिनांक ३०/०४/२०२५ पर्यंत सकाळी ११ वाजेपर्यंत ठेवण्याबाबत निर्देश दिले आहेत. करीता संदर्भांकित पत्राचे अवलोकन होऊन. उक्त आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करावी ही विनंती.

**संलग्न:**- संदर्भांकित आदेश.

(डॉ. अनिल हिरेखण)
**कुलसचिव**
**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.**

***प्रतिलिपी माहितीकरीता सादर:-***

1. *मा. कुलगुरू महोदयांचे स्वीय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.*
2. *मा. प्र-कुलगुरू, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.*
3. *मा. प्राचार्य, चंद्रपुर जिल्हा संलग्नित महाविद्यालये, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहितीस्तव सादर.*
4. *सिस्टीम ॲनालिस्ट, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना कळविण्यात येते की, सदर अधिसुचना विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करावी*

*E:\Letters\Circular 201*

महसूल विभाग

# जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, चंद्रपूर

E-mail :- chandrapur.rdc@gmail.com फोन - 07172 — 250659

कावि/समअ/नै.आ./टे-1/2025/410 दिनांक- 23 एप्रील 2025

**वाचले :-** 1. प्रादेशिक हवामान केंद्र, भारतीय हवामान खाते, नागपूर यांचा दिनांक 22/04/2025 चा हवामान ईशारा.
2. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, 2005

**आदेश : -**

**ज्याअर्थी,** चंद्रपूर जिल्ह्याकरिता प्रादेशिक हवामान केंद्र, भारतीय हवामान खाते, नागपूर यांनी दिनांक 22 ते 24 एप्रिल 2025 पर्यत उष्णतेच्या लाटेचा "ऑरेंज अलर्ट" व दिनांक 25 ते 27 एप्रिल 2025 पर्यन्त उष्णतेच्या लाटेचा "यलो अलर्ट" देण्यात आलेला आहे.

**आणि ज्याअर्थी,** वृध्द, गरोदर महीला, लहान व किशोर वयातील मुले हे उष्णतेच्या लाटेस जास्त संवेदनशील समजला जानारा गट असल्याने उष्णतेच्या लाटेचा परीणाम शालेय विद्यार्थ्यावर होऊ नये, याकरिता चंद्रपूर जिल्ह्यातील सर्व अंगणवाड्या, पुर्व प्राथमिक व प्राथमिक शाळा, विद्यालये व महाविद्यालये यांना दिनांक 23/04/2025 रोजी पासून दिनांक 30/04/2025 पर्यत शाळेच्या वेळेत बदल करणे आवश्यक आहे याबाबत माझी खात्री झाली आहे.

**त्याअर्थी,** मी विनय गौडा जी सी, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, चंद्रपूर, आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 मधील कलम 30 (2)(v) व (xviii) नुसार प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन, चंद्रपूर जिल्ह्यातील सर्व शासकीय व खाजगी अंगणवाड्या, पुर्व प्राथमिक व प्राथमिक/माध्यमिक शाळा, विद्यालये,महाविद्यालये यांचे शाळेच्या वेळेत बदल करून शाळा सकाळी 11 वाजेपर्यंतच शिकवणी वर्ग सुरू ठेऊन 11 नंतर विद्यार्थ्यांना सुट्टी द्यावी व उक्त आदेशाची अंमलबजावणी तात्काळ करावी.

नागरीकांनी भारतीय हवामान खात्याने वर्तवलेल्या अंदाजानुसार सतर्क राहून आवश्यक खबरदारी घ्यावी व आपतकालीन परिस्थितीत खालील दिलेल्या ठिकाणी संपर्क साधावा. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन नियंत्रण कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर संपर्क क्रमांक - 07172-250077

स्वा/-
**(विनय गौडा जी सी)**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,**
**चंद्रपूर**

प्रतिलिपी :- **माहीतीस तथा आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित.**

1. मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद चंद्रपूर
2. पोलिस अधिक्षक, चंद्रपूर
3. कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
4. आयुक्त, चंद्रपुर शहर महानगरपालिका, चंद्रपूर
5. शिक्षणाधिकारी, प्राथमिक/माध्यमिक जिल्हा परिषद चंद्रपूर
6. जिल्हा महिला व बालविकास अधिकारी जि.प.चंद्रपूर
7. जिल्हा माहिती अधिकारी, चंद्रपूर

**(विनय गौडा जी सी)**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,**
**चंद्रपूर**